# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.11.2024** **वारःशनिवार**

---

1. महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभेसह 2 लोकसभा आणि 48 पोटनिवडणुकांचे निकाल आज जाहीर होणार
2. आज जाहीर होणाऱ्या निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात राजकीय हालचालींना वेग
3. सांस्कृतिक वारशाच्या जतन आणि संवर्धनातून विकासाची उद्दिष्टे साध्य करू शकतो-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
4. छत्तीसगढमध्ये सुरक्षा बलं आणि माओवाद्यांच्या चकमकीत 10 माओवादी ठार आणि
5. गावस्कर-बॉर्डर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतीय फलंदाजी ढासळली, ऑस्ट्रेलियाची देखील पडझड

**<u>मतमोजणी तयारी</u>**

महाराष्ट्रातल्या 288 विधानसभा मतदारसंघांत मतमोजणीला आज सकाळी 8 वाजल्यापासून सुरुवात झाली आहे. मतमोजणीची सुरुवात टपाली मतांच्या मोजणीपासून झाली असून, त्यानंतर मतदान यंत्रावरच्या मतांची मोजणी सुरू होईल, अशी माहिती महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिली आहे. 288 विधानसभा मतदारसंघांमधल्या मतमोजणीसाठी तितकीच मोजणी केंद्रं काम करणार आहेत. नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणूकीच्या एका जागेसाठीची मतमोजणीही आज होत आहे.

या प्रक्रियेसाठी सुमारे 6600 पथकं नियुक्त करण्यात आली आहेत. मतमोजणी केंद्रांवर केंद्रीय पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि स्थानिक पोलिसांची त्रिस्तरीय सुरक्षाव्यवस्था तैनात करण्यात आली असून मतमोजणी प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख ठेवली जाणार आहे. दुपारी बाराच्या सुमाराला पहिला निकाल हातात येण्याची अपेक्षा आहे, मात्र मतदारसंघाच्या आकारमानानुसार यात फरक पडू शकतो. संध्याकाळी निकालाचं पूर्ण चित्र स्पष्ट होईल, असंही एस. चोक्कलिंगम यांनी नमूद केलं आहे. मतमोजणी केंद्रामध्ये उमेदवार, निवडणूक प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी यांना मोबाईल, पेजर, कॅलक्युलेटर, टॅब, इलेक्ट्रॉनिक रिस्ट वॉच आदी इलेक्ट्रॉनिक वस्तू वापरण्यास सक्त मनाई आहे, असं निवडणूक प्रशासनानं कळवलं आहे.

**<u>झारखंड मतमोजणी</u>**

झारखंड विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीलादेखील सुरुवात झाली आहे. राज्यातील सर्व 81 विधानसभा जागांसाठी शांततेत मतमोजणी व्हावी यासाठी निवडणूक आयोगाने चोख व्यवस्था केली आहे. प्रत्येक

मतमोजणी केंद्रावर त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था करण्यात आली असून राज्यातील जिल्हा मुख्यालयात 24 मतमोजणी केंद्रं स्थापन करण्यात आली आहेत. अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी यांनी दिली आहे. आसाम, बिहार, छत्तीसगढ, गुजरात, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, मेघालय, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यांतल्या विधानसभा आणि केरळमधील वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीची मतमोजणीदेखील आज होत आहे.

**<u>राजकीय घडामोडी वेग</u>**

विधानसभा निवडणुक निकालांच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडीतील राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग आला आहे. दोन्ही बाजूच्या नेत्यांनी सत्तेत येण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. निकालांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल भाजपा नेत्यांची बैठक घेतली, तर, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी भाजपा प्रदेश कार्यालयात आढावा घेतला. दरम्यान, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या उमेदवारांची काल बैठक झाली. अपक्ष आणि छोट्या पक्षांकडूनही विविध प्रकारची राजकीय चाचपणी सुरु आहेत.

**<u>भाजप-तावडे</u>**

महाराष्ट्रातील नालासोपारा इथे नोटा वाटप प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या तक्रारीवरुन, भाजपा सरचिटणीस विनोद तावडे यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी आणि पक्षाच्या प्रवक्त्या सुप्रिया श्रीनाटे यांच्यावर मानहानीचा खटला दाखल केला आहे. आपली प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न केला जात असून, लवकरच सत्य समोर येईल असं तावडे यांनी म्हटलं आहे. या प्रकरणामुळे काँग्रेसचं, खालच्या पातळीवरचं राजकारण आणि देशाची दिशाभूल करण्याचा त्यांचा हतबल प्रयत्न उघड होतो. भाजपा सत्य आणि जनतेच्या विश्वासाच्या जोरावर उभा आहे असं तावडे यांनी समाजमाध्यमातील संदेशात म्हटलं आहे.

**<u>कारवाई</u>**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत पुणे जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने राज्यात सर्वाधिक, 7 कोटी 63 लाख 34 हजार रुपयांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती-जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

**<u>राष्ट्रपती-हैदराबाद</u>**

भारत आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचं जतन आणि संवर्धन करून विकासात्मक उद्दिष्टं साध्य करू शकतो असं प्रतिपादन, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल हैद्राबाद मध्ये केलं. हैद्राबाद इथे, 'कोटी दीपोत्सवम' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. आपल्या भाषणात राष्ट्रपतींनी "समग्र आणि सर्वसमावेशक विकास" या दिशेनं होत असलेल्या भारताच्या प्रगतीवर भर दिला. देशाच्या नागरिकांनी एकत्रीतपणे काम करून, विकसित भारत निर्माण करण्यासाठी योगदान दिलं पाहिजे असं त्या पुढे म्हणाल्या. या कार्यक्रमाला तेलंगणचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, केंद्रीयमंत्री जी. किशन रेड्डी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते काल हैदराबादमध्ये, लोकमंथनाच्या चौथ्या आवृत्तीचं उद्घाटन झालं. देशाच्या दक्षिणेकडील राज्यांमध्ये प्रथमच अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**पंतप्रधान-माध्यमबैठक**

गेल्या 10 वर्षांपासून आपल्या सरकारने राबविलेल्या सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तन या त्रीसूत्रीमुळे जग आता भारताचं धोरणात्मक महत्त्व मान्य करत आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. जर्मनीच्या स्टुटगार्टमधील एका माध्यम समूहाने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमाला ते दूरस्थ माध्यमातून संबोधित करत होते. 'भारत-जर्मनी: शाश्वत विकासासाठी दिशादर्शक' ही या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना होती. गेल्या काही वर्षांत भारत आणि जर्मनी यांच्यातील परस्पर भागीदारी सातत्याने मजबूत होत असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं.

**मनकीबात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, रविवारी, आकाशवाणीवरून 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा 116 वा भाग आहे.

**राजनाथ सिंह**

लाओस दौऱ्यावर असलेले केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल त्यांचे जपानी समकक्ष जनरल निकतानी यांची भेट घेतली. हवाई क्षेत्रात सहकार्याची नवीन क्षेत्रे शोधण्यावर तसंच 'संरक्षण उत्पादन क्षेत्रात' सह-उत्पादन आणि सह-विकासामध्ये सहकार्य वाढविण्यास उभय नेत्यांनी सहमती दर्शविली.

**सीबीएसई**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ CBSE ने एकच कन्या अपत्य असणाऱ्या गुणवान विद्यार्थिनींच्या शिष्यवृत्तीकरता पात्रता धारकांकडून ऑनलाइन अर्ज मागवले आहेत. 2024 वर्षात CBSE च्या 10वी उत्तीर्ण झालेल्या तसंच CBSE-संलग्न शाळांमध्ये इयत्ता 11वीत शिकत असलेल्या एक कन्या अपत्याकरता CBSE मेरिट स्कॉलरशिप योजनेसाठी हे अर्ज मागवले आहेत. याशिवाय, 2023 मधल्या शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठीही ऑनलाइन अर्ज मागवण्यात आले आहेत. ऑनलाइन अर्ज 23 डिसेंबरपर्यंत CBSE च्या संकेतस्थळावर भरता येतील.

**माओवादी**

छत्तीसगड मधल्या सुकमा जिल्ह्यात भेज्जी या जंगल आणि डोंगराळ भागात काल सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत 10 माओवादी ठार झाले. या भागात सुरक्षा दलाकडून शोध मोहीम राबवली जात असताना ही चकमक झाली. घटना स्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्र साठा आणि दारुगोळा जप्त करण्यात आला आहे

**बॅडमिंटन**

चींन मध्ये सुरू असलेल्या चायना मास्टर्स 2024 बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरी गटात, भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रँकीरेड्डी यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला असून, आज त्यांची लढत दक्षिण कोरियाच्या

जिन योंग आणि सेओ सेउंग जे या जोडीशी लढत होईल. भारतीय जोडीने काल उपांत्यपूर्व लढतीत किम अस्ट्रूप आणि अँडर स्कारुप रासमुसेन या डॅनिश जोडीचा पराभव केला.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या बहुप्रतीक्षित बॉर्डर- गावसकर चषक मालिकेतला पहिला सामना पर्थ इथल्या ऑप्टस मैदानावर कालपासून सुरू झाला. भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माच्या अनुपस्थितीत जसप्रीत बुमराह भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. काल सामन्याच्या पहिल्या दिवशी भारतीय संघ केवळ 150 धावांत गारद झाला. भारतीय गोलंदाजांनीदेखील अचूक मारा केल्यामुळे, ऑस्ट्रेलियाचे फलंदाज देखील एकामागोमाग एक तंबूत परतले. कालच्या 7 गडी बाद 67 धावांवरून ऑस्ट्रेलियाने फलंदाजीला सुरुवात केली असून, आतापर्यंत त्यांच्या 9 गडी बाद 83 धावा झाल्या आहेत.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**